महाराष्ट्र शासन

# कला संचालनालय

सर ज.जी.कला शाळा आवार, डॉ. दा.नौ. मार्ग, मुंबई- ४०० ००१,
दूरध्वनी क्र. ०२२- २२६२०२३१/३२, Email : higherartexam@gmail.com

क्रमांक : डिओए/एचएई-२०२१/चार/ १९९ | दिनांक:०७/०७/२०२१

<u>वाचावे :</u> या कार्यालयाचे परिपत्रक क्र. डिओए/एचएई/२०२१/चार/१९२, दिनांक २५/०६/२०२१

## परिपत्रक

### शासकीय उच्चकला परीक्षा- २०२१

### पदविका / प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या परीक्षेचे अंतर्गत मुल्यमापनाबाबत.

संदर्भिय परिपत्रकानुसार अधिष्ठाता / प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समितीने परीक्षेस पात्र असलेल्या नियमित तसेच पुर्नप्रविष्ट (रिपिटर/एटीकेटी) विद्यार्थ्यांचे वार्षिक वर्गकामाच्या आधारावर महाविद्यालय स्तरावर अंतर्गत मुल्यमापन करण्याबाबत कळविण्यात आले आहे. त्यानुषंगाने अंतर्गत मुल्यमापनाबाबतच्या मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे देण्यात येत आहे.

**त्रिसदस्यीय समिती :**

अंतर्गत मुल्यमापन व तद्नुषंगिक कामाकरीता कला महाविद्यालय स्तरावर अधिष्ठाता / प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली संबधित विषय शिक्षकांचा समावेश असलेली त्रिसदस्यीय समिती गठीत करावी. समिती गठीत केल्याचा कार्यालयीन आदेश महाविद्यालयाकडे जतन करुन ठेवण्यात यावा.

**प्रात्यक्षिक विषयांचे मुल्यमापन :**

१) पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी वर्षभर केलेल्या स्वाध्यायांचे समितीने अंतर्गत मुल्यमापन करुन प्रात्यक्षिक विषयांचे गुणदान करावे.

२) मुलभूत अभ्यासक्रमाच्या वार्षिक स्वाध्यायानुसार विषयांचे अंतर्गत मुल्यमापन करुन त्या त्या विषयानुसार गुणदान करावे.

[रंगशास्त्र (प्रात्यक्षिक-सैध्दांतिक) विषयाबाबत कळविण्यात येते की, रंगशास्त्र या विषयाचे वार्षिक १०० गुणांकरिता ८ प्रात्यक्षिक व २ सैध्दांतिक असे एकुण १० स्वाध्याय आहेत. रंगशास्त्र प्रात्यक्षिक विषयासाठी ८ स्वाध्यायापैकी निवडक ६ स्वाध्यायांना प्रत्येकी १० पैकी दिलेल्या गुणांची बेरीज विचारात घेऊन ६० पैकी विद्यार्थ्याला प्राप्त झालेले एकुण गुण संबधीत रकन्यात भरावे व सैध्दांतिक विषयाच्या २ स्वाध्यायाकरीता ४० गुण असल्याने प्रत्येकी १० पैकी दिलेल्या गुणांची बेरीज करुन त्याचे दुप्पट गुण ४० पैकी गुणदानाकरीता विचारात घेऊन निकालपत्रकातील संबधीत रकान्यात भरावे. तसेच ज्या विषयांचे स्वाध्याय १० पेक्षा जास्त (उदा. निसर्ग चित्रण,वस्तू चित्रण) आहेत, अशा विषयांचे निवडक १० स्वाध्यायांचे संबधीत विषयाला १०० पैकी गुण दयावे.]

३) ए.टी.डी. प्रथम वर्ष, इंटरमिजिएट (ड्राईंग ॲन्ड पेंटींग, अप्लाईड आर्ट व स्कल्प्चर ॲन्ड मॉडेलिंग) या अभ्यासक्रमांचे गतवर्षीप्रमाणे अंतर्गत मुल्यमापन करुन गुणदान करावे.

४) ए.टी.डी. द्वितीय वर्ष अभ्यासक्रमाचे प्रकल्प, पपेट जर्नल, पपेट परीक्षा, स्क्रीन जर्नल, स्क्रीन परीक्षा, सराव पाठ व वार्षिक स्वाध्याय यांचे समितीने मुल्यमापन करुन त्या त्या विषयानुसार गुणदान करावे.

५) शिक्षणशास्त्र पदविका (DIP.A.ED.) या अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे प्रकल्प (PROJECT), सराव पाठ (PRACTICE LESSON+ THEORY TUTORIALS) यांचे समितीने त्या त्या विषयानुसार मुल्यमापन करुन गुणदान करावे.

६) आर्ट मास्टर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे सराव पाठांचे मुल्यामापन करुन त्या त्या विषयानुसार समितीने गुणदान करावे.

७) डिप्लोमा (ड्राईंग ॲन्ड पेंटींग, अप्लाईड आर्ट व स्कल्प्चर ॲन्ड मॉडेलिंग) अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांचे प्रबंध (DISSERTATION) व वर्गकाम/वार्षिक स्वाध्याय इ. विषयानुरुप तपासून परीक्षा समितीने गुणदान करावे.

८) डिप्लोमा टेक्सटाईल (प्रिंटींग व डाईंग), डिप्लोमा टेक्सटाईल (विव्हींग), डिप्लोमा इंटेरिअर डेकोरेशन व सिरॅमिक्स व पॉटरी या अभ्यासक्रमांतील विद्यार्थ्यांचे वार्षिक वर्गकाम/स्वाध्याय नूसार मुल्यांकन करुन गुणदान करावे.

**सैध्दांतिक विषयांचे मुल्यमापन :**

पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील सैध्दांतिक विषयाबाबत त्रिसदस्यीय समितीने विद्यार्थ्यांचे (Tutorials) Sessional Work नुसार अंतर्गत मुल्यमापन करुन गुणदान करावे.

**मौखिक विषयांची परीक्षा:**

पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा विविध मिटींग अप्लीकेशनचा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने महाविद्यालय स्तरावर समितीने घ्यावी. शक्य नसल्यास टेलिफोनिक पध्दतीने घ्यावी व त्यानुसार मौखिक विषयांचे गुणदान करावे.

**निकालपत्रक तयार करणे :**

१) सर्व विद्यार्थ्यांचे (नियमित व रिपिटर/एटीकेटी) परीक्षा क्रमांक, संपूर्ण नाव व मुल्यांकन केलेले गुण http://doaonline.in/HAE2021/nameandmarksentry या लिंकवर अचूकपणे भरावयाचे आहे. लिंकवर एकदा निकालपत्रक Submit केल्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल करता येणार नाही. तसेच निकालाची गुणपडताळणी करता येणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे निकालपत्रकात गुण भरल्यानंतर Ledger View या टॅब्वर जावून संबधीत अभ्यासक्रमाच्या निकालाची प्रथम तपासणी करावी व त्यानंतरच निकालपत्रक Sbmit करावे. निकालपत्रक Submit केल्यानंतर त्याची Print काढून त्यावर अधिष्ठाता / प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखालील त्रिसदस्यीय समितीने स्वाक्षरी करुन Upload करावी व निकालपत्रकाची मुळ प्रत (Hard Copy) मोहोरबंद करुन अधिष्ठाता / प्राचार्य यांच्या ताब्यात ठेवावी.

२) रिपिटर/एटीकेटी विद्यार्थ्यांचे गुण नमुद करतांना त्यांचे मागील वर्षाच्या परीक्षेतील उत्तीर्ण विषयांचे गुण अचूकपणे नमुद करावे.

३) निकालपत्रक भरतांना संबधीत अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांनी विषय पर्यायापैकी जो विषय निवडला असेल त्याच विषयाला गुणदान करण्यात यावे व लागू नसलेल्या विषयासाठी **NA** असे नमुद करावे.

४) निकालपत्रक भरतांना संबधीत अभ्यासक्रमातील ग्रुप विषयांचे एकुण गुण ऑनलाईन प्रणालीमध्ये Update केल्यानंतर ते आपणास Ledger View मध्ये दिसून येईल.

५) ज्या विद्यार्थ्यांचे गुण ७० % किंवा त्यापेक्षा अधिक असतील त्यांचे वर्गकामाचे पोर्टफोलिओ व मुल्यांकनाबाबतचे पीडीएफ अधिष्ठाता /प्राचार्य यांनी निकालपत्रकांच्या स्थळप्रतीसोबत कला महाविद्यालयाकडे जतन करुन ठेवायचे असून आवश्यकतेनुसार तपासणीच्या वेळी निरीक्षकांना उपलब्ध करुन द्यावे.

६) परिपुर्ण निकालपत्रक अधिष्ठाता/प्राचार्य यांनी दिनांक ०९जूलै, २०२१ ते १६जूलै, २०२१ पर्यंत सदर लिंकवर Submit करावे. निकालपत्रक सादर करतांना मुलभूत अभ्यासक्रम, कला शिक्षक प्रशिक्षण (द्वितीय वर्ष), अंतिम वर्ष पदविका व उर्वरीत अभ्यासक्रम या प्राधान्यक्रमाने निकालपत्रक सादर करावीत.

७) लिंकवर निकालपत्रक भरतांना काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास Helpline No. 8929207668 या क्रमांकावर संपर्क साधावा. (E-mail : inform.doa@gmail.com)

८) सर्व महाविद्यालयांची अभ्यासक्रमनिहाय निकालपत्रके प्राप्त होतील त्याप्रमाणे निकाल जाहीर करण्यात येईल.

(राजीव मिश्रा)
प्र. कला संचालक
कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,

१) अधिष्ठाता, सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई
२) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, नागपूर
३) अधिष्ठाता, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालय, औरंगाबाद
४) प्राचार्य, सर्व शासनमान्य अशासकीय कला महाविद्यालये.

प्रत,

१) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक दोन, कला संचलनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) निरिक्षक, चित्रकला व शिल्प, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) निवड नस्ती.